**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
==============================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
--------------------------------------------------------------------------------------------------
**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**
==============================================================

# संत तुकारामांच्या निवडक अभंगाचा अभ्यास

**मयुरी पांडुरंग शिंदे**

मराठी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी - संशोधक विद्यार्थिनी

**प्रस्तावना:**

ज्ञानदेवांच्या आळंदीपासून जवळच असणाऱ्या इंद्रायणी काठच्या देहू क्षेत्रात एका पवित्र श्रीमंत घराण्यात तुकोबांचा जन्म झाला. तुकोबांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले यांचा जन्म देऊन इ.स.सन १५९८ (श१५२०) मध्ये झाला. वाढवडील देऊ चे महाजन या सदन घराण्यात पूर्व पार विठ्ठल भक्ती चालत आलेली म्हणून विठ्ठल भक्ती ही त्यांच्या घराण्याची मिरास होती. तुकारामांचे व्यक्तिमत्व हे विनयशील सर्व शांतता प्रिय आणि कनवाळू होते. हे त्यांच्या अभंगावरून लक्षात येते. काही वेळा ते रागीट कडवट गावंढळ असल्याचे जाणवते तरी ते मुळात क्षमाशील ,चिंतनशील, संवेदनशील आणि मन मोकळे होते त्यांच्या अभंगावरून ते ज्ञानी व सुविध्य असल्याचेही सिद्ध होते व ते अशिक्षित ही समजूत खोटी आहे. त्यांचा विकास हा आपल्या नैसर्गिक वातावरणात बिजापासून संपूर्ण आकार प्राप्त होत गेलेला एखादा मोठा वृक्षफोफवावा असा प्रतीत होतो.

संत तुकाराम एक साक्षात्कारी संत होते त्यांना एक भक्ती तत्त्वातून नीतीबोध आणि सत विचार समाजात रुजवायचा होता. तर त्यांच्या आड येणाऱ्या रूढी व ढोंगबाजीवर हल्ला करायचा होता. संत तुकाराम याद्दृष्टीने एक उत्तम लोकशिक्षक ठरतात. तुकाराम आपली साधक अवस्था अभंगातून मांडतात त्यावेळी 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' अशी त्यांची अवस्था होते त्यांच्या उत्स्फूर्त भावनांचा तो सहज उद्रेक असतो. ते उत्कट कवी आहेत हे त्यांच्या अभंग वाणी मधून आपल्याला जाणवते

संत तुकारामांच्या
निवडक अभंगाचा अभ्यास:

संत तुकारामांच्या अभंगाची भाषा ही सर्वसामान्य जणांना समजेल उमजल अशी आहे समाजातील वाईट चालीरीती कर्मकांड भोंदूगिरी पर्यावरण भावपर प्रसंगीक नितीपर भक्तीपर आत्मचरित्रपर अभंग रचना त्यांनी केली आहे. तुकोबांच्या कोणत्या अभंगात ते स्वतः आहेत त्यांच्या भावना त्यांचे विचार त्यांच्या आशा आकांक्षा ही सारे त्यांच्या अभंगातून व्यक्त होते तुकारामांच्या काळात समाजाची फार देणे अवस्था होती समाजात प्रचंड व्यवस्था माजली होती राजकीय अस्थिरता महाराष्ट्राच्या वाट्याला आली होती 300 वर्षाच्या कालखंडात सोन्यासारख्या संस्कृतीची अक्षरशः माती झाली होती विस्कटलेल्या समाजात बुवाबाजी अनाचार व तंत्रविद्येला

ऊत आला होता धर्माच्या नावाखाली समाजाला सर्रास लुबाडले जात होते अंगारे धुपारे जादूटोणा कर्मकांड नवस चमत्कार यांचा बुजबुजाट झाला होता समाजात ढोंगी गुरूंची संख्या खूपच वाढली होती अशा ढोंगी गुरूंचा समाचार घेताना तुकोबा म्हणतात

"ऐसे कैसे झाले भोंदू | कर्म करुनी म्हणती साधू ||अंगा लावून या राख |डोळे झाकून करती पाप || दाऊनी वैराग्याची कळा | भोगी विषयाचा सोहळा || तुका म्हणे सांगू किती | जणू तयांची संगती ||

हे गर्विष्ठ लोक खऱ्या अर्थाने साधूंची निंदा करतात सज्जनांची हेटाळणी करतात स्नान संध्या न करणारे भांग पिणारे व मद्यपान करणारे हे दांभिक संत "तुका म्हणे अवघे सोंग | तेथे केचा पांडुरंग || अशा ढोंगी साधू वर तुकारामाने शस्त्र धरले आहे. तुकारामांनी स्वतः विषयी घराविषयी कुटुंबाविषयी अभंग लिहिले आहेत त्यातून त्यांचे आत्मचरित्र आपणास पहावयास मिळते देवी आपत्ती दुष्काळात आलेले संकटे घरातील व्यक्तीचा झालेला मृत्यूत्यामुळे आलेले वैराग्य साधक अवस्थेतील अनुभव ही सारे त्यांनी अर्त भावाने सांगितले आहे.

बरे झाले देवा निघाले दिवाळे |बरी या दुष्काळी पीडा केली || अनुतापे तुझे राहिले चिंतन | झाला हा वमन संसार || बरे झाले देवा बाईल कर्कशा | बरी हे दुर्दशा जनामध्ये || बरे झाले जगी पाऊल अपमान |बरे गेले धन गुरे ढोरे ||बरे झाले नाही धरीली लोक लाज | बरे आलो
तुझं शरण देवा ||बरे झाले तुझे केले देवाईल | लेकरे बाईला उपेक्षिली || तुका म्हणे बरे व्रत एकादशी | केले उपाशी जागरण||

दोन बायका आईबाप दोन भाऊ मुले इतर यांच्यासह गावात महाजन की करून व्यापारात मग्न असणारे व सावकारी करणारे तुकाराम संसारात समाधानी होते दुष्काळ पडला संसारातील सुख संपले व्यापाराची दिवाळे निघाले मग त्यांनी संसाराकडे पाठ फिरवली आप्तजनांचा मृत्यू झाला संसाराचे पाश तुटत गेले आणि दुष्काळाने दिवाळे निघाले देवांचे चिंतन राहिले संसार ओकारी वाटू लागला अपमान झाला धन गेले या सर्व गोष्टी चांगल्या झाल्या बायका मुलांना सोडून देऊन तुझ्या पायाशी शरण आलो एकादशी हा अंधश्रद्धीचा मार्ग आहे असे त्यांनी म्हटले आहे तुकारामांचे अभंग सृष्टीचे मुख्य प्रेरणा म्हणजे भक्ती

घे माझे वाचे | गोड नाम विठोबाचे|| तुम्ही घ्या रे डोळे सुख| पहा विठोबाचे मुख| |तुम्ही ऐका रे कान | माझ्या विठोबाचे गुण|| मना तेथे धाव घेई| राहे विठोबाच्या पायी|| तुका म्हणे जिवा नको सोडू या केशवा||

त्यांच्या देहाला आणि त्यातील ज्ञानेंद्रियांना विठ्ठलाचे आकर्षण आहे विठ्ठलाचे रूप गोड आहे नाम गोड आहे त्याच्या पायाशी सर्व सुख आहे असे ते म्हणतात वाणी विठ्ठल नामात रमावी दृष्टी विठ्ठल दर्शनात बुडावी कानांनी गुणगान ऐकावे मनाने विठ्ठलाच्या पायी धाव घ्यावी असे जीवाने केशवाला सोडू नये ही तुकारामांची इच्छा!

तुकोबांनी संसारिक लोकांना भरपूर उपदेश केला आहे त्यातून त्यांनी समाजातील दोषावर घाव घातला आहे चालीरीती व ज्ञानावर हल्ला केला आहे आपले शरीर नाशवंत आहे हे लक्षात घेऊन परोपकार करा सावध व्हा आणि स्वतःच्या आयुष्याचे रक्षण असा आध्यात्मिक उपदेश त्यांनी केला ते म्हणतात

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे| उदास विचारे वेच करी|| उत्तमची गती तो एक पावेल |उत्तम भोगीला जीवखाणी || परउपकारी नेणे परनिंदा| पर स्त्रिया सदा बहिणी माया|| भूतदया गाई पशूंचे पालन| तान्हेल्या जीवन वनमाजी|| शांती रुपये नव्हे कोणाचा वाईट |वाढवी महत्व वडिलांचे|| तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ| परमपद बळ वैराग्याचे||

चौक व्यवहाराने पैसा मिळवावा उदास वृत्तीने खर्च करावा दुसऱ्यावर उपकार करावेत दुसऱ्यांची निंदा करू नये पर स्त्रिया आई बहिणी प्रमाणे मानाव्यात प्राणिमात्रा विषयी दया बाळगावी वृत्ती शांत ठेवावी कुणाशी वाईट वागू नये मच्छर करू नये तहानलेल्यास पाणी द्यावे ज्येष्ठांचा मान ठेवावा समाज घटकांना शासन करावे ज्येष्ठांचा मान ठेवावा

नाही निर्मळ जीवन| काय करील साबण ||तैसे चित्त शुद्ध नाही| तेथे बोध देईल काही|| वृक्षन धरी पुष्प व फळ| काय करील वसंत काल|| वांझा ना होती लेकुरे| काय करील भ्रतारे|| बाईल पुरुषाशी| काय करावे बाई|| प्राण निघता शरीर| काय करावे व्यवहारे ||तुका म्हणे जीवणेवीण| फिके नव्हे नव्हे जाण||

जर पाणी निर्मळ नसेल तर साबण काय करणार तसेच जिद्द सुद्धा नसेल तर कोणताही बोध काही करू शकणार नाही जर वृक्षहा पुष्प व धारणच करत नसेल तर कोणताही ऋतू आला तर ही त्याचा काय उपयोग जर वाच स्त्रीला लेकरू होत नसेल तर नवऱ्याने काय करावे तसेच बाई पुरुषाला बाईने काय करावे त्याचबरोबर एखाद्याच्या अंगातून प्राण निघून गेला असता कोणताच व्यवहार होऊ शकणार नाही अशा रीतीने उपमांचा प्रतिमांचा वापर करून संत तुकाराम अभंग समजावून सांगतात.

संत तुकारामांनी आपल्या अभंगातून शब्दांचे सामर्थ्य सांगितले आहे

"आम्हा घरी धन शब्दांची रत्ने| शब्दाची शस्त्र येत्ने करू| शब्दाची आमच्या जीवाचे जीवन| शब्द वाटून धन जनलोका| तुका म्हणे शब्द हाचि देव |शब्दाची गौरव पूजा करू||"

प्रस्तुत अभंगातून तुकारामांनी शब्दांचे महत्त्व पटवून दिले आहे आमच्या घरी शब्द धन आहे शब्द हे शस्त्र म्हणून वापरू शब्द हेच जनसामान्यांमध्ये वाटू तसेच आमच्यासाठी शब्द हाच देव असून आम्ही शब्दांचीच पूजा करू.

तुकोबांची कविता ही प्रतिमा उपमा दृष्टांत यातून लोक जीवनाचे प्रतिबिंब दर्शवते खरे तर तुकोबांचा हा गुणधर्म नाही मात्र या उपमा प्रतिमा त्यांच्या काव्याशी इतक्या अनुरूप आहेत की उपमा व उपमेय यांत भेद करणे तुकोबांच्या अभंगाच्या बाबतीत अशक्यच आहे

"हिरा ठेविता ऐरणी| वाचे मारिता जो घणी|| तोची मोल पावे खरा| करणीचा होय चुरा|| मोहरा तोची अंगे |सुत न जळे ज्याच्या संगे|| तुका म्हणे तोचि संत| सोसी जनांचे आघात||"

या अभंगात संत तुकाराम हिऱ्याची प्रतिमा वापरतात जो हिरा असतो त्यावर किती घनाचे घाव घातले तरी त्याचा चुरा होत नाही मोहरा जी असते तिच्या सोबत सूत जळत नाही त्याचप्रमाणे जो संत असतो सज्जन असतो तो जगाचे जनांचे आघात सोसतो समाजातील संतांचे लक्षण व वैशिष्ट्ये सांगण्यासाठी अभंगात हिरा व मोहरा या प्रतिमांचा वापर केला आहे.

अशाप्रकारे केवळ वारकऱ्यांनाच नव्हे तर साऱ्या समाजाला नीती मूल्यांची आठवण करून देणे हे तुकोबांनी आपले कर्तव्य मांडले रंजल्या गांजल्यांना पोटाशी धरून प्रेमाने वाचल्याची उधळण करणारा प्रसंगी कठोर आणि परखड बनवून जीवन भाष्य करणारा जनक जनार्दन शोधून मानवतेची द्वारे फिरवणारा तुकाराम हा महाकवी होता.

संदर्भ ग्रंथ-एका लेखकाचा अभ्यास :मध्ययुगीन तुकाराम यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.